## शासकीय अध्यापक महाविद्यालयात, पनवेल

### बी.एड.वर्ग २०२३-२५

### बी.एड. प्रथम वर्ष: २०२३-२४(सत्र पहिले)

# एक आठवड्याचे समाजकार्य शिबीर

# सामुहिक अहवाल

| समाजकार्य प्रभारी | अध्यक्ष |
| --- | --- |
| प्रा.डॉ.बी.जी. खाडे | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |

समाजकार्य प्रशिक्षणार्थी प्रमुख / उपप्रमुख

१) श्री.अक्षयकुमार अनिल नारंगकर

२) श्री. विक्रम नथु दळवी

# एक आठवड्याचे समाजकार्य शिबीर

## अनुक्रमणिका

| अ.क्र | वार व दिनांक | समाजकार्य तपशील |
|---|---|---|
| १. | मंगळवार<br>१९ डिसेंबर २०२३ | शासकीय अध्यापक<br>महाविद्यालय ,पनवेल परिसर |
| २. | मंगळवार<br>२३ जानेवारी २०२४ | कुष्ठरोगी निवारण समिती<br>शांतीवन, नेरे |
| ३. | बुधवार<br>२४ जानेवारी २०२४ | एस.टी बस स्थानक आगार<br>व्यवस्थापक कार्यालय पनवेल<br>वशासकीय अध्यापक<br>महाविद्यालय ,पनवेल परिसर |
| ४. | गुरुवार<br>२५ जानेवारी २०२४ | शासकीय अध्यापक<br>महाविद्यालय ,पनवेल परिसर |
| ५.<br>६ . | मंगळवार<br>१३ फेब्रुवारी २०२४ | जनजागृती साहित्य निर्मिती<br>समाजकार्य कृतीत<br>प्रशिक्षणार्थ्यांच्या परिसरातील<br>समाजकार्य |

**शासकीय अध्यापक महाविद्यालयात, पनवेल**

**बी.एड.वर्ग २०२३-२५**

**बी.एड. प्रथम वर्ष: २०२३-२४(सत्र पहिले)**

**<u>एक आठवड्याचे समाजकार्य शिबीर अहवाल</u>**

मुबई विद्यापीठाच्या बी.एड अभ्यासक्रमानुसार प्रकल्प आधारित कार्य अंतर्गत एक आठवड्याचे समाजकार्य शिबीर आयोजित केले होते. आमच्या महाविद्यालयात बी.एड वर्ग २०२३-२५ प्रकल्प आधारित कार्य

**पहिला दिवस :- शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल परिसर**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे मंगळवार दिनांक १९ डिसेंबर २०२३ रोजी एक दिवसीय समाजकार्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. नियोजनानुसार १९ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रथमवर्ष सर्व प्रशिक्षणार्थी श्रमदानाच्या तयारीने महाविद्यालयात उपस्थित राहिले. प्रारंभी सर्वांची उपस्थिती नोंदवून प्रार्थना घेण्यात आली. मार्गदर्शक प्राध्यापक डॉ.बी.जी.खाडे यांनी "**समाजकार्य संकल्पना** व स्वरुप" समजावून दिले व समाजकार्याची **आचारसंहिता** स्पष्ट केली. प्रशिक्षणार्थीचे कार्य विभागणीसाठी पाच गटात विभाजन करण्यात आले. गटानुसार सर्वांना श्रमदानाचे साहित्य देण्यात आले. सकाळी ठीक १०.०० ते १०.१५ या वेळेत मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते कल्पवृक्षाच्या रोपाची लागवड करुन श्रमदान शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.

सकाळी ठीक १०.१५ ते १.०० आणि २.४५ ते ५.०० या कालावधीत श्रमदानाचा कार्यक्रम घेण्यात आला. शिक्षण प्रशिक्षणार्थीच्या पाचही गटांनी त्यांना नेमून देण्यात आलेला महाविद्यालयाचा परिसर श्रमदान करून स्वच्छ व सुंदर केला. श्रमदानाच्या कार्यक्रमासाठी सर्वांचा उत्साह दिसून आला. खो-खो चे मैदान, हॉलीबॉल, महाविद्यालयाच्या परिसरातील रस्ते व प्रशासकीय इमारतीसमोरील परिसर इत्यादी सफाई प्रशिक्षणार्थीनी केली. कल्पवृक्षाच्या झाडांना आळं करुन त्यांना पाणी देण्यात आले. एकूणच महाविद्यालय परिसराची स्वच्छता करून महाविद्यालयाचा परिसर सुंदर राखण्याचा प्रयत्न केला. त्यातून प्रशिक्षणार्थीच्या ठिकाणी श्रमप्रतिष्ठा, सहकार्य, स्वच्छता, सौंदर्यदृष्टी, पर्यावरण सर्वेक्षण व सर्वधन इत्यादी मूल्याची रुजवणूक होण्यास मदत झाली. दुपारी १.०० ते १.३० या कालावधीत सामुहिक स्नेहभोजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. १.४५ ते २.४५ या कालावधीत मेकिंग द चेन, तळयात मळयात,

अशाप्रकारचे उपक्रम घेण्यात आले. संध्याकाळी ५.०० ते ५.३० या कालावधीत समाजकार्य शिबीराचा समारोप घेण्यात आला. अध्यक्षांच्या परवानगीने राष्ट्रगीताने शिबीराची सांगता झाली.

**दुसरा दिवस :- कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन नेरे, पनवेल**

कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन नेरे, पनवेल येथे मंगळवार दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी एक दिवसीय समाजकार्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. नियोजनानुसार २३ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ८:०० वाजता प्रथम वर्षाचे सर्व प्रशिक्षणार्थी श्रमदानाच्या तयारीने पनवेल रेल्वे स्टेशन ते शांतीवन असा बस-प्रवास करुन शांतीवन, नेरे येथे उपस्थित झाले.

सुरुवातीला सकाळी ठीक ९:०० ते ९:१० या वेळेत शांतीवन, नेरे येथे प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती नोंदवून प्रार्थना घेण्यात आली. समाजकार्य प्रभारी प्राध्यापक डॉ.बी.जी. खाडे यांनी समाजकार्याची आचारसंहिता स्पष्ट केली. प्रशिक्षणार्थ्यांचे कार्य विभागणीसाठी चार गटात विभाजन करण्यात आले. गटानुसार सर्वांना श्रमदानाचे साहित्य देण्यात आले.

सकाळी ९:१० ते ११:१० या कालावधीत श्रमदानाचा कार्यक्रम घेण्यात आला. शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या चारही गटांनी त्यांना नेमून देण्यात आलेला शांतीवनाच्या परिसरातील आंब्याच्या झाडांना खत व पाणी मुरण्यासाठी आळे तयार केले .श्रमदानाच्या कार्यक्रमासाठी सर्वांचा उत्साह दिसून आला. एकूणच सर्वांनी परिसर सुंदर राखण्याचा प्रयत्न केला. त्यातून प्रशिक्षणार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, सहकार्य, सौंदर्यदृष्टी, पर्यावरण सर्वेक्षण व संवर्धन इत्यादी मूल्यांची रुजवणूक होण्यास मदत झाली. दुपारी १२:०० ते १:३० या कालावधीत अभ्यासक्रमांतर्गत असणाऱ्या विषयाला अनुसरून प्रथम वर्षीय प्रशिक्षणार्थ्यांनी कुष्ठरोगी बांधवांच्या कुटुंबाचे सर्वेक्षण केले. दुपारी १:३० ते २:३० या कालावधीत सामूहिक स्नेहभोजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. २:३० ते ३:३० या कालावधीत भारत-महाभारत, प्रसंगानुसार कृती, टाळ्यांचे प्रकार इत्यादी विविध प्रकारचे खेळ घेण्यात आले.यातुन प्रशिक्षणार्थ्यांना कमीत कमी जागे मध्ये मुलांचे खेळ घेण्याचे कौशल्य प्राप्त झाले. संध्याकाळी ४:३० ते ५:०० या कालावधीत समाजकार्य शिबीराचा समारोप झाला. शिबिराची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**तिसरा दिवस :- एस.टी. बस स्थानक आगार व्यवस्थापक कार्यालय, पनवेल व शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल परिसर**

बुधवार, दिनांक २४ जानेवारी २०२४ या दिवशी पनवेल एस.टी. बस स्थानक आगार व्यवस्थापक कार्यालय, पनवेल व शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल परिसरातील समाजकार्य शिबीर सकाळ सत्रात ठीक ११.०० ते १:४५ या कालावधीत श्रमदानाच्या अंतर्गत स्वच्छता मोहिमेचा

कार्यक्रम पनवेल एस.टी. बस स्थानकात राबविण्यात आला. शिक्षण प्रशिक्षणार्थ्यांच्या चारही गटांनी त्यांना नेमून देण्यात आलेल्या एस.टी बस स्थानकाचा परिसर श्रमदान करून स्वच्छ व सुंदर केला. श्रमदानाच्या कार्यक्रमात सर्वांचा उत्साह दिसून आला. एस.टी. बस स्थानकातील परिसर, परिसरातील रस्ते व प्रशासकीय इमारतीसमोरील परिसर, इत्यादींची सफाई प्रशिक्षणार्थ्यांनी केली. एकूणच पनवेल एस.टी. बस स्थानकाचा परिसर स्वच्छ करून सुंदर राखण्याचा प्रयत्न केला. त्यातून प्रशिक्षणार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, सहकार्य, स्वच्छता, सौंदर्य दृष्टी, पर्यावरण सर्वेक्षण व संवर्धन इत्यादींची रुजवणूक होण्यास मदत झाली.

दुपार सत्रात ठीक १:४५ ते २:३० या कालावधीत स्नेहभोजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. दुपारी २:३० ते ५:०० या कालावधीत प्रजासत्ताक दिनानिमित्त शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे श्रमदान कार्यक्रम घेण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त शिक्षण प्रशिक्षणार्थ्यांच्या मनात राष्ट्रीय उत्सवांबाबतीत जाणीव निर्माण करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**चौथा दिवस :- शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल महाविद्यालय परिसर**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल महाविद्यालय परिसरात येथे गुरुवार दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी एक दिवसीय समाजकार्य शिबीराचे आयोजन करण्यांत आले. सकाळी ११:१५ ते १:४५ व त्यानंतर ३:३० ते ४:१० या कालावधीत श्रमदानाचा कार्यक्रम घेण्यात आला. शिक्षण प्रशिक्षणार्थ्यांच्या चारही गटांनी त्यांना नेमून देण्यात आलेला महाविद्यालयाचा परिसर श्रमदान करून स्वच्छ व सुंदर केला. श्रमदानाच्या कार्यक्रमासाठी सर्वांचा उत्साह दिसून आला. खो-खो व हॉलीबॉलचे मैदान, महाविद्यालयाच्या परिसरातील रस्ते व प्रशासकीय इमारतीसमोरील परिसर, इत्यादी ठिकाणी प्रशिक्षणार्थ्यांनी स्वच्छता केली. एकूणच महाविद्यालय परिसराची स्वच्छता करून सर्वांनी महाविद्यालयाचा परिसर सुंदर राखण्याचा प्रयत्न केला. त्यातून प्रशिक्षणार्थ्यांमध्ये सहकार्य, स्वच्छता, सौंदर्यदृष्टी, पर्यावरण सर्वेक्षण व संवर्धन, इत्यादी मूल्यांची रुजवणूक होण्यास मदत झाली.

दुपारी १:४५ ते २:३० या कालावधीत सामूहिक स्नेहभोजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. दुपारी ठीक २:३० ते ३:३० या कालावधीत **'केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था रायगड महाराष्ट्र राज्य'चे संस्थापक, सर्पमित्र राजू मुंबईकर** यांचे व्याख्यान घेण्यात आले. या व्याख्यानाला प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. सर्पमित्र राजू मुंबईकर यांनी पर्यावरणातील लुप्त होत चाललेले प्राणी, पक्षी, सरपटणारे जीव इत्यादींची माहिती दिली. तसेच सापांचे महत्त्व पर्यावरण जीवनात किती महत्त्वाचे आहे,

हे समजावून दिले. यातून सापांविषयी असलेली अंधश्रद्धा तसेच प्राणी, पक्षी यांच्याविषयी असलेली अंधश्रद्धा प्रशिक्षणार्थ्यांच्या मनातून दूर करण्याचा प्रयत्न केला. ४:१० ते ५:०० या कालावधीत प्रजासत्ताक दिनानिमित पूर्वतयारी करण्यात आली. यात रंगीत तालीम, फलकलेखन, रांगोळी, रंगमंच सजावट इत्यादी बाबी राबविण्यात आल्या.

**पाचवा दिवस व सहावा दिवस :- जनजागृती साहित्य निर्मिती समाजकार्य कृती आणि प्रशिक्षणार्थीच्या परिसरातील समाजकार्य**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे मंगळवार दिनांक 13 फेब्रुवारी 2024 रोजी वैयक्तिक पातळीवर जनजागृती साहित्य निर्मिती आणि प्रत्यक्ष समाजकार्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

13 फेब्रुवारी 2024 रोजी समाजकार्य प्रभारी प्राध्यापक डॉ. बी. जी खाडे यांनी समाजकार्य संकल्पना व स्वरूप समजावून दिले. व समाजकार्याची आचारसंहिता स्पष्ट केली. वैयक्तिक पातळीवर प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थ्यांना समाजाला वेगवेगळ्या पध्दतीने संदेश देण्यासाठी जनजागृती साहित्य निर्मिती व प्रत्यक्ष समाजकार्य हे वैयक्तिक पातळीवरती राबविण्यास सांगितले.

**जनजागृती साहित्य निर्मिती समाजकार्य कृती**

समाजकार्य प्रभारी डॉ.बी. जी. खाडे यांनी निश्चित केलेल्या कार्यामध्ये प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थ्यांनी वैयक्तिक समाजकार्य अंतर्गत जनजागृती साहित्य निर्मिती तयार केली. यात प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थ्यांनी उत्साहाने भाग घेऊन पोस्टर्स, घोषवाक्य, नाटक अशा वेगवेगळ्या कृतीद्वारे साहित्य निर्मिती करुन समाजाला जागृत व संदेश देण्याचा प्रयत्न केला.

**प्रशिक्षणार्थीच्या परिसरातील समाजकार्य**

शिक्षक- प्रशिक्षणार्थी वास्तव करत असलेल्या ठिकाणी स्थानिक परिसरात रक्तदान, श्रमदान/स्वच्छता, वृक्षारोपण, रस्ता दुरुस्ती, अन्नदान वाटप, गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप इत्यादी प्रकारचे सामाजिक कार्य केली. यातून समाजाविषयी असलेले प्रेमभावना समाजाविषयी असलेले आपुलकी कार्यातून दिसून आली.

# एक आठवड्याचे समाजकार्य शिबिर (वर्ष: २०२३-२४) क्षणचित्रे



# शासकीय अध्यापक महाविद्यालयात पनवेल

## कार्यक्रम पत्रिका

## एक दिवसीय समाजकार्य शिबीर

## दिनांक :- १९ डिसेंबर २०२३

| वेळ | उपक्रम |
|---|---|
| १०.०० | उपस्थिती |
| १०.० ते १०.१५ | प्रार्थना |
| १०.१५ ते १०.३० | उद्घाटन सोहळा |
| १०.३० ते १.०० | श्रमदान |
| १.०० ते १.३० | सस्नेह भोजन |
| १.४५ ते २.४५ | सर्पमित्र श्री राजू मुंबईकर (केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था रायगड )यांचे व्याख्यान विषय :- "सर्प: समज व गैरसमज" |
| २.४५ ते ५.० | श्रमदान |
| ५.०० ते ५.३० | समारोप |

**दिनांक १९ डिसेंबर २०२३.** **वेळ:- १०.०० ते ५.३०**

**स्थळ :- शासकीय अध्यापक महाविद्यालयात परिसर**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल जि. रायगड

RBhosle
**Principal**
Government College of Education (C.T.E.)
Panvel, Dist. Raigad - 410 206.

# शासकीय अध्यापक महाविद्यालयात, पनवेल

## निमंत्रण पत्रिका

## एकदिवसीय समाजकार्य शिबीर

आपणांस कळविण्यात आनंद होत आहे, की शासकीय अध्यापक महाविद्यालयात, पनवेल येथे मंगळवार दिनांक १९ डिंसेबर २०२३ (वेळ : १०.०० ते ५.३०) रोजी एक दिवसीय समाज कार्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबारामध्ये प्रथम वर्षाच्या सर्व छात्राध्यापकांनी सहभागी होणे अनिवार्य राहील याची नोंद घ्यावी. सकाळी ठीक १०.०० वाजता महाविद्यालयात उपस्थित राहवे .

**आयोजक**

समाजकार्य प्रमुख.

प्रा.डॉ.बी.जी.खाडे

**अध्यक्ष**

मा.प्राचार्य.डॉ.रमा भोसले

**समाजकार्य प्रशिक्षणार्थी.**

प्रतिनिधी.

१)श्री.अक्षयकुमार नारंगकर.

२)श्री.विक्रम दळवी

**सहभागी प्राध्यापक वृध्द**

प्रा.बिजली दडपे

प्रा. डॉ. प्रियंका सुभेदार

प्रा. डॉ. निलीमा मोरे

प्रा. डॉ. उज्जवला डोणे

दिंनाक :- १९ डिसेंबर २०२३. वेळ १०.० ते ०५.३० वा.

स्थळ :- शासकीय अध्यापक महाविद्यालयात परिसर

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल ★ जि. रायगड ★

RBhosle

Principal
Government College of Education (C.T.)
Panvel, Dist. Raigad - 410 206.

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

**बी.एड.वर्ग २०२३-२०२५ प्रथम वर्ष (प्रथम सत्र) २०२३-२४**

**प्रकल्प आधारित कार्य: समाजकार्य**

**एक दिवसीय समाजकार्य शिबिर**

| अ.क्र | वेळ | कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | ८.०० ते ९.०० | पनवेल स्टेशन (पूर्व) नवीन पनवेल ते शांतीवन बस प्रवास |
| २ | ९.०० ते ९.१० | शांतीवन येथे प्रशिक्षणार्थींची उपस्थिती |
| ३ | ९.१० ते ११.१० | श्रमदान |
| ४ | ११.१० ते १२.०० | शांतीवन माहिती |
| ५ | १२.०० ते १.३० | कुष्ठरोगी बांधवांच्या कुटुंबांचे सर्वेक्षण |
| ६ | १.३० ते २.३० | स्नेहभोजन |
| ७ | २.३० ते ३.३० | विविध कार्यक्रम |
| ८ | ३.३० ते ४.३० | शांतीवन दर्शन |
| ९ | ४.३० ते ५.०० | समारोप |

समाजकार्य विभाग प्रभारी

प्रा.डॉ.बी.जी.खाडे

RBhosale

अध्यक्ष

Principal

मा.प्राचार्य.डॉ.रमा भोसले

Government College of Education (C.T.E.)

Panvel, Dist. Raigad - 410 206.

प्रशिक्षणार्थी प्रतिनिधी

१)श्री.अक्षयकुमार नारंगकर

२)श्री.विक्रम दळवी

दिनांक:- २३/०१/२०२३.

स्थळ:- कुष्ठरोग निवारण केंद्र शांतीवन नेरे, पनवेल.

महाराष्ट्र शासन

Government of Maharashtra

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल जि. रायगड – ४१०२०६

E mail : govt_bedcollege@rediffmail.com

Website : www.panvelbedcollege.org

Phone No. 022-27453000 Fax No. 022-27453000


क्र.शाअमप/समाज कार्य/बी.एड.वर्ग -२०२३-२५/ शै.व:२०२३-२४/.21 दिनांक:१२/१/२०२४

प्रति.

मा.कार्यवाहक,

कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन नेरे.

ता.पनवेल.जि.रायगड.

**विषय: आपल्या परिसरात शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथील शिक्षक- प्रशिक्षणार्थ्यांचे एक दिवशीय (२३/०१/२०२४) शिबिर आयोजित करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयी मुंबई विद्यापीठाच्या बी.एड .अभ्यासक्रमानुसार आमच्या महाविद्यालयातील बी.एड.च्या ३३ प्रशिक्षणार्थ्यांचे दिनांक २३/०१/२०२४ या दिवशी एक दिवसीय समाजकार्य शिबिराचे आपल्या परिसरात आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. तरी सदर शिबिराचे आयोजन करण्याची परवानगी मिळावी ही विनंती.

सदरील काळात संस्थेकडून खालील सहकार्याची अपेक्षा आहे.

१) परिसरातील कुष्ठरोगी कुटुंबीयांचे सर्वेक्षण करण्याची परवानगी मिळावी.

२) संस्थेची व परिसराची माहिती व पाहणी करून देण्याची व्यवस्था करावी.

३) प्रशिक्षणार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम व उद्बोधन करण्याची व्यवस्था करावी.

४) परिसरात श्रमदान करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

५) प्रशिक्षणार्थी स्वतःचे भोजन स्वतः घेऊन येतील त्यांना तेथे भोजन करण्याची परवानगी द्यावी.

आमचे प्रशिक्षणार्थी संस्थेच्या नियमांचे काटेकोर पालन करतील.तरी आपण परवानगी द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

RBhosley

प्राचार्य

प्राचार्य

(डॉ.रमा भोसले)

शासकीय अध्यापक महाविद्यालय

पनवेल - ४१० २०६ (रायगड).

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल ★ जि. रायगड ★

V. C. Shin

13/1/24

KUSHTHAROG NIWARAN SAMITI

"Shantivan" P.O. Nere,

Tal Panvel Dist Raigad-410206

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

### बी.एड.वर्ग २०२३-२०२५ प्रथम वर्ष (प्रथम सत्र) २०२३-२४

### प्रकल्प आधारित कार्यः समाजकार्य

बुधवार दिनांकः- २४/०१/२०२३.

एक दिवसीय समाजकार्य शिबिर

| अ.क्र | वेळ | बुधवार दिनांक २४/०१/२०२३ |
|---|---|---|
| १ | सकाळी ११.०० | उपस्थित |
| २ | ११.०० ते ११.१५ | परिपाठ |
| ३ | ११.१५ ते १२.३० | आंतरवासिता सादरीकरण सहभाग |
| ४ | १२.३० ते १.३० | स्वच्छता मोहीम |
| ५ | १.४५ ते २.३० | स्नेहभोजन |
| ६ | २.३० ते ३.३० | प्रजासत्ताक दिनानिमित्त गीत गायनाची पूर्व तयारी |
| ७ | ३.३० ते ५.०० श्रमदान | श्रमदान |

समाजकार्य विभाग प्रभारी

प्रा.डॉ.बी.जी.खाडे

अध्यक्ष

RBhosle

मा.प्राचार्य.डॉ.रमा भोसले

PRINCIPAL
Govt. College of Education
PANVEL-410 206 (Raigad).

प्रशिक्षणार्थी प्रतिनिधी

१)श्री.अक्षयकुमार नारंगकर

२)श्री.विक्रम दळवी

बुधवार दिनांकः- २४/०१/२०२३.

स्थळः- शासकीय अध्यापक महाविद्यालय , पनवेल

**महाराष्ट्र शासन**

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल जि. रायगड - ४१०२०६**

प्रति

मा. आगार व्यवस्थापक

रा. प. पनवेल आगार

विषयः समाजकार्य अंतर्गत आपल्या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्याची परवानगी देणेबाबत.

संदर्भः- शुक्रवार दिनांक १९/०१/२०२४ रोजी आपल्याशी भ्रमणध्वनीवरून चर्चा झाली.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयी मुंबई विद्यापीठाच्या बी.एड अभ्यासक्रमानुसार आमच्या महाविद्यालयातील बी.एड. च्या ३३ प्रशिक्षणार्थ्यांचे बुधवार दिनांक २४/०१/२०२४ या रोजी आपल्या आगार-परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यासाठी आमच्या शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची इच्छा आहे. तरी त्यांना परवानगी देऊन सहकार्य करावे, ही विनंती. सहकार्याबद्दल धन्यवाद.

आपली विश्वासू

प्राचार्य

(डॉ.रमा भोसले)

20/01/24

लिपीक
प्रशासन शाखा
रा प पनवेल आगार

Edit wit… ffice

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## बी.एड.वर्ग २०२३-२०२५ प्रथम वर्ष (प्रथम सत्र) २०२३-२४

## प्रकल्प आधारित कार्यः समाजकार्य

## एक दिवसीय समाजकार्य शिबिर

गुरूवार दिनांकः- २५/०१/२०२३

| अ.क्र | वेळ | कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | ११.०० | उपस्थित |
| २ | ११.०० ते ११.१५ | परिपाठ |
| ३ | ११.१५ ते १.४५ | श्रमदान |
| ४ | १.४५ ते २.३० | स्नेहभोजन |
| ५ | २.३० ते ३.३० | सर्प मित्र श्री.राजू मुंबईकर यांचे व्याख्यान<br>( सर्प केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था रायगड महाराष्ट्र राज्य संस्थापक राजू ब.मुंबईकर ) |
| ७ | ३.३० ते ४.१० | श्रमदान - रांगोळी, सजावट, स्टेज व्यवस्था। |
| ८ | ४.१० ते ५.०० | प्रजासत्ताक दिन पूर्वतयारी |

समाजकार्य विभाग प्रभारी

प्रा.डॉ.बी.जी.खाडे

अध्यक्ष

R.Bhoslay

मा.प्राचार्य.डॉ.रमा भोसले

PRINCIPAL
Govt. College of Education
PANVEL-410 206 (Raigad)

प्रशिक्षणार्थी प्रतिनिधी

१)श्री.अक्षयकुमार नारंगकर

२)श्री.विक्रम दळवी

गुरूवार दिनांकः- २४/०१/२०२३.

स्थळः- शासकीय अध्यापक महाविद्यालय ,पनवेल परिसरात

Edit with WPS Office

महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल जि. रायगड – ४१०२०६

E mail : govt_bedcollege@rediffmail.com
Website : www.panvelbedcollege.org

Phone No. 022-27453000 Fax No. 022-27453000

शाअमप/समाज कार्य /बी.एड./२०२३-२४/.645 दिनांक:25/1 /2024

प्रति

मा.श्री.राजू मुंबईकर

सर्पमित्र

**विषय: "सर्प: समज व गैरसमज" या विषयावरील व्याख्यानाच्या आभाराबाबत.**

**संदर्भ: गुरुवार दिनांक २५/१ /२४ रोजी "सर्प: समज व गैरसमज" या विषयावरील आपले अभ्यासपूर्ण व्याख्यान.**

महोदय ,

उपरोक्त संदर्भीय विषयी आपण आमच्या महाविद्यालयात ~~सोम~~ गुरुवार दिनांक २५/१ /२०२४ रोजी **"सर्प: समज व गैरसमज" या विषयावरील आपले अभ्यासपूर्ण व्याख्यान देऊन** आमच्या शिक्षक-प्रशिक्षणार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. आपल्या व्याख्यानामुळे आमच्या प्रशिक्षणार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षण व संवर्धन विषयक जाणीव जागृती निर्माण झाली. सर्पाविषयीची उत्कृष्ट माहिती देऊन सर्पाविषयींचे गैरसमज दूर केलेत. आपण आमच्या निमंत्रणाचा स्वीकार करून नियोजित वेळेत आमच्या विद्यार्थ्यांना उदबोधित केलेत त्याबद्दल महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षक- प्रशिक्षणार्थी यांच्या वतीने आम्ही आपले हार्दिक हार्दिक आभार मानत आहोत. आपले या महाविद्यालयाशी असलेले ऋणानुबंध असेच वृद्धिंगत होवोत हीच सदिच्छा..!

**आ.वि.**

9819198947

R Bhosale

**प्राचार्य (डॉ.रमा भोसले )**

Principal
Government College of Education (C.T.E.)
Panvel, Dist. Raigad - 410 206.